सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
पर्यटन विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

✆ दुरध्वनी क्र. ०२२-२२०२५६०८ ✉ Email - tourism-4@mah.gov.in

क्रमांक : टिडीएस-२०२६/११/प्र.क्र.१२६/पर्यटन-४ **दिनांक : १९ नोव्हेंबर, २०२६**

प्रति,

सह / उप सचिव (आस्थापना)
महसूल विभाग, ग्राम विकास विभाग,
वित्त विभाग (महाराष्ट्र राज्य कर सेवा व लेखा व कोषागार)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

विषय : पर्यटन विभागांतर्गत पर्यटन संचालनालयातील "उपसंचालक, सहायक संचालक" ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत

संदर्भ :
१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही २०११/ प्र.क्र.१३७/ का.१२, दि. १७/१२/२०१६.
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/का.१२, दि.१६/०२/२०१८
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.संकीर्ण २०१७/प्र.क्र.१२०/कार्या-१४, दि.३१/०८/२०१७

राज्य शासनाच्या विविध विभागात विभागाच्या अधिपत्याखालील मंडळे/ महामंडळातील पदांवर संबंधित प्रशासकीय विभागाकडून प्रतिनियुक्तीने करावयाच्या नियुक्त्यांबाबतचे धोरण सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र.१ येथील दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये जाहीर केलेले असून संदर्भ क्र.२ येथील दि.१६.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये सदर धोरणामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. तसेच

संदर्भ क्र.३ येथील दि.३१.८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीबाबत कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे.

०२. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार पर्यटन संचालनालय, मुंबई या कार्यालयाच्या आस्थापनेवरील "उपसंचालक" ४ पदे, "सहायक संचालक" १ पद प्रतिनियुक्तीने भरावयाचे असल्याने सदर पदावर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता इच्छूक असलेल्या आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांची नावे या विभागास जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत ई-मेलद्वारे/ प्रत्यक्षपणे निश्चितपणे प्राप्त होतील अशा रितीने पाठविण्यात यावी.

०३. सबब, "उपसंचालक", "सहायक संचालक" या पदावर प्रतिनियुक्तीसाठी मागणीपत्र मागविण्यात येत आहे. याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे :-

अ. क्र.	पदनाम	पदस्थापनेचे ठिकाण	वेतनश्रेणी (सातव्या वेतन आयोगानुसार)	समकक्ष पद	प्रतिनियुक्तीने भरावयाची पदसंख्या
१	२	३	४	५	६
१	उपसंचालक	पर्यटन संचालनालय, मुंबई यांच्या अधिनस्त विभागीय कार्यालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूर	किमान वेतन श्रेणी एस-२३, रुपये ६७७००-२०८७००	मंत्रालयीन विभागातील अवर सचिव किंवा समतुल्य वेतनश्रेणी मधील समान वेतनबँड व ग्रेड पे च्या पदावरील अधिकारी.	४ पदे
२	सहायक संचालक	पर्यटन संचालनालय, मुंबई	किमान वेतन श्रेणी एस-१५: रुपये ४१८००-१३२३००	कक्ष अधिकारी /सहायक कक्ष अधिकारी किंवा समतुल्य वेतनश्रेणी मधील समान वेतनबँड व ग्रेड पे च्या पदावरील अधिकारी.	१ पद

०२. तरी, विनंती करण्यात येते की, सदर पदावर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता इच्छूक असलेल्या आपल्या विभागातील/ आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांची नावे

त्यांच्या मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालांसह, वैयक्तिक माहिती व ना-विभागीय चौकशीचे प्रमाणपत्र इ. माहिती संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय दि.१७ डिसेंबर, २०१६ व संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णय दि.१६ फेब्रुवारी, २०१८ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे याबाबतची माहिती सोबतच्या विहित करण्यात आलेल्या विवरणपत्रामध्ये या विभागाकडे **जहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत** ई-मेलद्वारे/ प्रत्यक्षपणे निश्चितपणे प्राप्त होतील अशा रितीने कृपया पाठवावीत. इच्छूक अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीसाठी निवड झाल्यास त्यांना संबंधित विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे याबाबतही कृपया अभिप्राय द्यावेत. आपल्या विभागातून प्रतिनियुक्तीसाठी कोणीही अधिकारी इच्छूक नसल्यास, निरंक असेही कृपया कळविण्यात यावे. एकदा निवड झालेल्या अधिकाऱ्याला त्याचे नाव मागे घेता येणार नाही.

०३. तसेच, विनंती करण्यात येते की, सदर पत्र त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

(सुमंत दि. पाष्टे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत :- वरीलप्रमाणे
प्रत: निवडनस्ती (पर्यटन ४)

विवरणपत्र

पर्यटन विभागांतर्गत पर्यटन संचालनालयातील "उपसंचालक, सहायक संचालक" ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत

१	अधिकाऱ्याचे संपूर्ण नांव	
२	पदनाम/ संवर्ग पदाची वेतनश्रेणी	
३	सध्याच्या कार्यालयाचे नांव व पत्ता व दूरध्वनी क्रमांक	
४	जन्म दिनांक	
५	शैक्षणिक अर्हता	
६	भ्रमणध्वनी क्रमांक	
७	ज्या पदावर प्रतिनियुक्तीवर जाण्यास इच्छूक आहे ते पद	
८	मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत)	
९	संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे? तसेच, त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार / लाचलुचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरण, फौजदारी प्रकरण प्रलंबित आहे किंवा कसे,	
१०	संबंधित अधिकाऱ्याची निवड झाल्यास त्यास तात्काळ कार्यमुक्त करण्यात येईल किंवा कसे-	
११	संबंधित अधिकारी कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या दिनांकास १०% पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत किंवा कसे,	
१२	शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.१७.१२.२०१६ व दि.१६.०२.२०१८ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे,	

***